**सं.फौ.ख.क्र. ३४९/२०२२**

**बाळासाहेब किरकाडे –वि– नामदेव जाधव**

**निशाणी क्र. १९ खाली.**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ बाळासाहेब लक्ष्मण किरकाडे यांचा शपथेवर ज्यादाचा सरतपासत फिर्यादीचे विधिज्ञ श्री.पी. आर. चव्हाण यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

१. मी प्रस्तुतकामी मुळ चेक, चेक जमा केल्याची पावती, रिटर्न मेमो मुळ प्रत, आरोपीला पाठविलेली नोटीस ऑफीस प्रत, पोस्टाची पावती, आरोपीला नोटीस मिळाल्याची पोहोच पावती दाखल केलेली आहे. त्यांना अनुक्रमे **निशाणी क्र ३४ ते ३९** देण्यात येते.

सदर मुळ कागदपत्रांना निशाणी देण्यास आरोपीचे विधिज्ञ श्री. व्ही. ए. व्यवहारे यांनी संमती दिल्यामुळे त्यांना वरीलप्रमाणे निशाणी देण्यात आली.

**ज्यादाचा सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे विधिज्ञ श्री. व्ही. ए. व्यवहारे यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

२. माझे शिक्षण इयत्ता ४ थी पर्यंत झाले आहे. मला लिहिता वाचता येते. माझी शेती वडनेर भैरव येथे असून तिचा गट नं. २२९१ असा आहे. त्याचे क्षेत्र २ एकर ४ गुंठे आहे. हे म्हणणे खरे आहे की त्याचा ७/१२ उतारा मी प्रस्तुतकामी दाखल केलेला नाही. मला दोन मुले आहेत. हे म्हणणे खरे नाही की माझी शेती मी १० ते १२ वर्षांपूर्वी माझ्या मुलांमध्ये वाटून दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की माझी मुले माझ्यापासून वेगळे

राहतात. हे म्हणणे खरे आहे की माझी शेती माझी मुले बघतात व त्यापासून येणारे उत्पन्न देखील माझी मुलेच घेतात.

३. आरोपी माझ्या गावातीलच व माझा नातेवाईक असल्यामुळे मी त्याला ओळखतो. माझे शेतीचे वार्षिक उत्पन्न साधारणतः १५ ते २० लाख एवढे आहे. मी आयकर भरत नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे वार्षिक उत्पन्न साधारणतः १५ ते २० लाख एवढे असल्याचे दाखवणारा माझ्या तोंडी शब्दांव्यतिरिक्त कोणताही पुरावा माझ्याकडे नाही.

४. मी माझ्या मुलाकडून १० लाख रुपये घेऊन ते आरोपीला जमिन घेण्यासाठी दिले. मी आरोपीला कोणत्या तारखेला पैसे दिले ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की निशाणी ३४ कडील चेकवरील अक्षर व सही यामध्ये फरक आहे. साक्षीदार पुन्हा सांगतो की चेकवरची सही आरोपीची आहे.

५. हे म्हणणे खरे आहे की आरोपीची वडनेर भैरव येथील शेती विकून त्याने शिवरे येथे शेती विकत घेतली आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की त्या जमिनीच्या व्यवहाराच्या इसारतीसाठी त्याने आरोपीला रक्कम दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की जमिनीच्या व्यवहाराच्या इसारतीसाठी मी आरोपीला पैसे दिल्याचे माझ्या नोटीसमध्ये, फिर्यादमध्ये व पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या मुलाकडून रक्कम रुपये १० लाख घेऊन ते आरोपीला दिल्याचे माझ्या नोटीसमध्ये, फिर्यादमध्ये व पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की आरोपीचा चेक गहाळ झालेला होता तो मला सापडला. त्याचा गैरवापर करुन मी आरोपीविरुद्ध सदरची खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला १० लाख रुपये देण्यासाठी माझ्याकडे उत्पन्नाचे कोणतेही स्त्रोत नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला जमिन खरेदी घेण्यासाठी मी १० लाख रुपये दिल्याचे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2025.11.26 16:59:28 +0530

**दिनांक – २६/११/२०२५**
**ठिकाण –चांदवड.**

**( वृषाली दी. सुंगारे)**
**सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**क.स्तर चांदवड.**